# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

सायंकाळ

**(पोलीस वार्तापत्र)**

**दिनांक १८.०९.२०२५ गुरूवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे सक्करदरा :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक १७.०९.२०२५ चे २२.३० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क. ४ पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत पेट्रोलींग करीत असता, लकी चिकन सेंटर जवळ, रिंगरोड, बेसा पॉवर हाऊस, आशिर्वाद नगर येथे एक ईसम संशयीतरित्या दिसल्याने त्याचे जवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेवुन, त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव नितीन लक्ष्मण तिडके, वय ४९ वर्षे, रा. जुनी मंगळवारी, गुजरी चौक, लकडगंज, नागपूर असे सांगीतले. आरोपीस पोलीस ठाणे येथे आणुन त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क. ०३ यांचे हद्दपार आदेश क. ०४/२०२५ दि. १७.०४.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सक्करदरा येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे लकडगंज :— सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल.**

दिनांक १६.०९.२०२५ चे २०.४० वा. चे सुमारास, फिर्यादी चा मुलगा नामे महेंद्र संतकुमार फटींग, वय २४ वर्षे, रा. जुना बाजार चौक, गुरूदेव राम मंदीर जवळ, डिप्टी सिग्नल, कळमना, नागपूर हा त्याचे बि.डी. आयर्न स्टील कंपनी, स्मॉल फॅक्टरी एरीया येथुन काम आटोपुन त्याचे मोटारसायकल क. एम.एच. ४९ सि.पी. ५७४२ ने पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत डिप्टी सिग्नल रेल्वे क्रॉसींगचे नविन ब्रिज पोल क. पि ०४ जवळुन घरी जात असता, पाऊस सुरू असल्याने रस्त्यावरून पाणी वाहत होते. फिर्यादीचे मुलास घटनास्थळावरील खड्डा न दिसल्याने तो त्याचे दुचाकीसह खड्यामध्ये पडल्याने त्याचे डोक्याला, पोटाला मार लागुन तो गंभीर जखमी झाला. जखमीस उपचाराकरीता न्यु ईरा हॉस्पीटल तेथुन राहाटे हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. रस्त्यावर खड्डे पडलेले असुन व पुलाचे काम सुरू असल्याने त्याचे साहीत्य रोडवर ठेवलेले आहे. त्यामुळे येणारे—जाणारे पैकी कोणालाही अपघात होवुन त्याचा मृत्यु होवु शकतो असे माहीत असुनसुध्दा आरोपी १) रोडचे काम करणारे ठेकेदार २) रेल्वे क्रॉसींग पुलाचे काम करणारे ठेकेदार व सुपरवायझर यांनी रोडवरील खड्डे न बुजविता व साहीत्य रोडचे बाजुला न करता, तसेच, सुरक्षिततेकरीता बॅरीगेटींग न लावता लोकांचे सुरक्षा करीता उचित उपाययोजना केली नाही. यातील आरोपी हे फिर्यादीचे मुलाचे मृत्युस कारणीभुत आहेत.

याप्रकरणी फिर्यादी संतकुमार गोपालराम फटींग, वय ५० वर्षे, रा. जुना बाजार चौक, गुरूदेव राम मंदीर जवळ, डिप्टी सिग्नल, कळमना, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. शिंदे ८४२११२८५५२ यांनी आरोपींविरूध्द कलम १०५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे नंदनवन :— प्राणांतीक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०१.०९.२०२५ चे ०५.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे पती नामे सचिन भाऊरावजी देशभ्रतार, वय ३४ वर्षे, रा. पडोळे नगर, नंदनवन, नागपूर हे पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत संघर्ष नगर चौक येथुन जात असतांना, एका अज्ञात चारचाकी वाहनाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे पतीस धडक देवुन पळुन गेला. फिर्यादीचे पती गंभीर जखमीं यांना उपचाराकरीता भवानी हॉस्पीटल, पारडी व तेथुन एन.एस.एस. हॉस्पीटल, गंगाबाई घाट चौक येथे दाखल केले होते. प्रकृतीत सुधार नसल्याने तेथुन दिनांक १६.०९.२०२५ रोजी शालीनीताई मेघे हॉस्पीटल, वानाडोंगरी येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक १७.०९.२०२५ चे ११.३० वा. चे सुमारास, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी श्रीमती दिक्षा सचिन देशभ्रतार, वय २८ वर्षे, रा. पडोळे नगर, नंदनवन, नागपूर यांनी पोलीस ठाणे नंदनवन येथे दिलेल्या तक्रारीवरून पोउपनि. शिंदे यांनी अज्ञात चारचाकी वाहन चालक आरोपीविरूध्द कलम २८१, १०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४, १८४, १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे तहसिल :—** पवन जगदीश पटेल, वय २५ वर्षे, रा. गांधीबाग, हल्दीराम स्टॉप, तहसिल, नागपूर हे दिनांक ०५.०९.२०२५ रोजी ०७.०० वा. पासुन पोलीस ठाणे तहसिल हद्दीतुन राहते घरी कोणाला काहीही न सांगता निघुन गेले. परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन**— रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, केस— काळे, उंची— ५ फुट ६ इंच, अंगात— ग्रे रंगाचा फुल शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.

**२) पोलीस ठाणे जुनी कामठी :—** रमजान अली मेहंदी हसन, वय २२ वर्षे, रा. जुनी खलासी लाईन, कामठी, नागपूर हे दिनांक १२.०९.२०२५ रोजी ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीतुन राहते घरी कोणाला काहीही न सांगता निघुन गेले. परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन**— रंग— सावळा, चेहरा— लांब, बांधा— सडपातळ, केस— काळे, उंची— ५ फुट ६ इंच, अंगात— महरून रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.

**३) पोलीस ठाणे कपीलनगर :—** सौ. सविता मनोज उईके, वय ३० वर्षे, रा. समतापुर बालाघाट, म.प्र. ह.मु.— बाबादिप सिंग नगर, कडु ले—आऊट, कपीलनगर, नागपूर ह्या दिनांक १५.०९.२०२५ रोजी ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीतुन राहते घरी कोणाला काहीही न सांगता सोबत मुलगी नामे कु. खुशी वय ६ वर्षे व मुलगा नामे रूद्र वय ४ वर्षे ह्यांचेसह निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन**— रंग— सावळा, चेहरा— लांब, बांधा— सडपातळ, केस— काळे लांब, उंची— ५ फुट, अंगात— गुलाबी रंगाची साडी व ब्लाऊज घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.





पवन रमजान सविता रूद्र खुशी

(ईतर)

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. आरोपींनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ०२, नागपुर. | ३०४००७० /२००२ | कलम ३८० भा.दं.वि. | राजेश नेकपाल खवानीराम, रा. युनिव्हर्सल लायब्ररी जवळ, रामदासपेठ, सिताबर्डी, नागपुर. | १९.०९.२०२५ |
| २. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ०२, नागपुर. | ३१६३२४/ २०१० | कलम २९२ भा.दं.वि. | संजय ऋषभदास चोरडीया, रा. फ्लॅट नं. ०१, कल्पना बिल्डींग, रामदासपेठ, नागपुर. | २०.०९.२०२५ |
| ३. | मा. १९ वे सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०२३७८/ २००९ | कलम ४५७, ३८० भा.दं.वि. | मारोती गजराज भारती, वय २४ वर्षे, रा. चामडीया स्कुल समोर, काचीपुरा, धरमपेठ, नागपुर. | २०.०९.२०२५ |
| ४. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ०२, नागपुर. | ३२४११०७ /२००३ | कलम ३२४, ३४ भा.दं.वि. | शाम रमेश गिरधारी, वय ४० वर्षे, रा. भिलगांव, कामठी, नागपुर. | २२.०९.२०२५ |
| ५. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ०३, नागपुर. | ३०४२६५/ २००६ | कलम १४३, १४७, १४८, १४९, ३३६ भा.दं.वि. | १) शेख वसिम शेख अफजल, रा. शांतीनगर कॉलोनी, गुप्ता किराणा जवळ,शांतीनगर, नागपुर. २) दिपक बब्बु समुद्रे, रा. शांती नगर चौक, स्विपर कॉलोनी. ३) शेख फईम शेख अफजल, रा. शांतीनगर, संतोषी माता मंदीर जवळ, नागपुर.४) प्रदीप धुब्बासिंग थापा, रा. कावरापेठ, लकडगंज, | २९.०९.२०२५ |
| ६. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ०२, नागपुर. | ३०१५३४/ २०१३ | कलम ३५३, ३४ भा.दं.वि. | पंकज शाम चरडे, रा. प्रेमनगर, झेंडा चौक, लकडगंज, नागपुर. | ०४.१०.२०२५ |

**स्वा/—**

**(अंकुश उ. राठोड)**

**पोलीस उप—निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**